**अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाकरीता राज्य हिश्श्याचा रु.१०० कोटी निधी वितरीत करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. H.D.-५१०१०/५०/२०२५-TRANSPORT५-MHD -Home Department**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२.०३.२०२६

**संदर्भ :**

१) गृह विभाग शासन निर्णय क्र. आरएलवाय-०९०९/१०५८/प्र.क्र.२१३/परि-५, दि.२३.१२.२००९.
२) गृह विभाग शासन निर्णय क्र. आरएलवाय -०११३/७९८/प्र.क्र.२/२०१३/ परि- ५, दि.१०.०६.२०१५.
३) गृह विभाग शासन निर्णय क्र. आरएलवाय -०८२१/प्र.क्र.११५/परि-५, दि.२०.०७.२०२२.
४) गृह विभाग शासन निर्णय क्र. आरएलवाय -०६२४/प्र.क्र.८३/ परि-५, दि.२०.०१.२०२५
५) मुख्य प्रशासकीय अधिकारी कार्यालय(निर्माण),मुंबई यांचे पत्र क्र.EW/ १६६/ BA/EBR(P) /२०२५ -२६,दि.०४.०७.२०२५.
६) गृह विभाग शासन निर्णय क्र.H.D.-५१०११/१४/२०२५-TRANSPORT ५-MHD-Home Department दि.१५.०९.२०२५

**प्रस्तावना:-**

राज्यातील ग्रामीण विशेषत: अविकसित भागातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी व हे प्रकल्प जलद गतीने पुर्ण व्हावेत या उद्देशाने निवडक रेल्वे प्रकल्पांमध्ये प्रकल्प खर्चाच्या ४०% ते ५०% आर्थिक सहभाग देण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या २६१.२५ कि.मी. लांबीच्या नवीन ब्रॉड गेज रेल्वे मार्ग उभारण्याच्या प्रकल्पामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के आर्थिक सहभाग देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

त्यानंतर सदर प्रकल्पाच्या रु.२८२६.०० कोटी इतक्या खर्चाच्या प्रथम सुधारित अंदाजपत्रकास संदर्भ क्र.२येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिली. त्यानंतर या प्रकल्पाच्या रु.४८०५.१७ कोटी इतक्या रकमेच्या सुधारित अंदाजित खर्चास व त्यानुसार प्रकल्प खर्चाच्या ५०% म्हणजे रु.२४०२.५९ कोटी इतका राज्य शासनाचा आर्थिक सहभाग देण्यास संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये दुसरी सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

आता, सदर प्रकल्पासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता राज्य शासनाचा हिस्सा रेल्वे विभागास मिळण्याची विनंती मध्य रेल्वेने संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये केली आहे. त्यानुसार, या रेल्वेमार्ग प्रकल्पाकरीता राज्य शासनाचा हिश्श्याचा एकूण रु.१५० कोटी निधी संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयान्वये वितरित केला आहे. यासह सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण रु.२२४१.२३ कोटी इतका निधी राज्य शासनाने वितरित केला आहे. आता उर्वरित निधी रेल्वे विभागास उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी (Financial Adviser and Chief Accounts Officer (Construction) Mumbai CSMT), मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई यांना अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या रेल्वेमार्ग प्रकल्पाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये राज्य शासनाच्या

हिश्श्याची रु.१०० कोटी (रुपये शंभर कोटी फक्त) इतकी रक्कम वितरित करण्यास राज्य शासन याद्वारे मंजुरी देत आहे.

०२. शासनाने उपसचिव (रोख शाखा), गृह विभाग यांना नियंत्रण अधिकारी व अवर सचिव/कक्ष अधिकारी, रोख शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबइ-४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केले असून या शासन निर्णयाव्दारे त्यांना सदर रक्कम प्रदान करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

०३. यासाठी येणारा खर्च सन २०२५-२६ या वर्षात मागणी क्र. बी-७, ३००१-भारतीय रेल्वे धोरण निश्चिती, संचालन, संशोधन व इतर संकीर्ण संघटना, ००, ८००-इतर खर्च, (००), (००) (०२)-रेल्वे प्रकल्पांमध्ये राज्य शासनाचा सहभाग (३००१-००५४), ३२-अंशदाने या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

०४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/विनियम, दिनांक १२/०१/२०२३ अन्वये सदर अंशदान हे “सशर्त” स्वरुपाचे आहे.

०५. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, अर्थसं २०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दि.२५.०७.२०२४ सोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर देयकांन्वये आहरीत करण्यात येणा-या रक्कमेचे स्वरुप "अंशदाने" या तपशीलवार शीर्षाखाली येते. त्यानुसार तपासणी करावयाच्या सूचीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.

०६. प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अर्थसं २०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३, दि.२५.०७.२०२४ मधील परिच्छेद क्र ४ ते १८ वरील नमूद मार्गदर्शक सूचना तसेच, अटी व शर्तीची पूर्तता होत आहे.

०७. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९१ /का.१४६१, दिनांक ११.०९.२०२५ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४६४/२०२५/व्यय-८, दिनांक १२.०९.२०२५ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत अहे.

०८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात अला असून त्याचा संकेतांक २०२६०३०२११२११२१२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2026.03.02 11:23:15 +05'30'

**( चेतन निकम )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) महालेखापाल, १ व २ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर.

२) सचिव, केंद्रीय रेल्वे बोर्ड, रेल्वे मंत्रालय, रेल भवन, नवी दिल्ली.

३) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई.

४) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मध्य रेल्वे, मुंबई.

५) मुख्य अभियंता (बांधकाम), मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई.

६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /नागपूर.

७) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई /नागपूर.

८) उप सचिव अर्थसंकल्प-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) वित्त विभाग (व्यय-८/अर्थ-११), मंत्रालय, मुंबई.

१०) नियोजन विभाग, कार्यासन १४६१, मंत्रालय, मुंबई.

११) कक्ष/कार्यासन अधिकारी (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर रक्कमेचा धनादेश Financial Adviser and Chief Accounts Officer (Construction), Central Railway, CSMT, Mumbai यांच्या नावाने काढण्यात यावा.

१२) निवड नस्ती, परिवहन-५.